उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण येथे ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधण्यासाठीच्या खर्चास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.५३५/परि-४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक : ११ जानेवारी २०१८

वाचा :

१) शासन ज्ञापन क्र.एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.१२(शिकाना)/परि-४,दि.०३ मार्च,२०१७.

२) परिवहन आयुक्त यांचे क्र.ब्रेचाप (०६)/१११६/न.क्र.४३/का-१० (१)/जा.क्र.२१८, दि.०४.०१.२०१८ चे पत्र.

प्रस्तावना :-

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण येथे गट क्र.२८/१, मौजे जिते, ता.पेण, जि.रायगड येथील ३.४० हेक्टर शासकीय भुखंडावर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २५० मीटर लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधण्यासाठी संदर्भाधीन शासन ज्ञापन दि.०३.०३.२०१७ अन्वये रु.६२.६९ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देण्यात आली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यानंतर सदर जमिनीच्या सपाटीकरणासाठी जादा काम करावे लागणार असल्याचे निदर्शनास आले. तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथील परिवहन कार्यालयातील वाहनांची चाचणी पेण येथे करावयाचे ठरविल्यामुळे पेण येथील ब्रेक टेस्ट ट्रॅकवरील ताण वाढणार असल्याने त्या क्षमतेची डांबरीकरणाची तरतूद करणे आवश्यक ठरले. त्यानुसार ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधकामाचा खर्च वाढला असून वाढीव खर्चाच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पेण येथे गट क्र.२८/१, मौजे जिते, ता.पेण, जि.रायगड येथील ३.४० हेक्टर शासकीय भुखंडावर मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २५० मीटर लांबीचा ब्रेक टेस्ट ट्रॅक बांधण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार रु.१,६४,०७,४७०/- (रुपये एक कोटी चौसष्ट लक्ष सात हजार चारशे सत्तर फक्त) इतक्या रकमेच्या प्रस्तावास पुढील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

Sr. No.	Particulars	Amount (in Rs.)
१	Break Test Track	१८,७७,१०१
२	Approach road	३७,५७,७७२
३	Land Levelling	७८,२७,१६९
४	Testing charges	९७,८५०
	Total	१,३५,५९,८९२
	Add ५ % Centage charges	६,७७,९९५
	Add ४ % for Contengencies	५,४२,३९६
	Add १२% GST	१६,२७,१८७
	Total	१,६४,०७,४७०

२. सदर मान्यता , पुढील अटींच्या अधिन राहून देण्यात येत आहे.

अ) सदर काम हे उपरोक्त तक्यात नमूद रकमेत पूर्ण होईल असे पहावे.

ब) सदर कामाचा खर्च उपलब्ध निधीतून भागवावा.

क) सदर अंदाजपत्रकात उपभोक्ता विभागाच्या सक्षम प्राधिका-याचे साक्षांकन आवश्यक आहे.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. बी-३, २०४१, वाहनांवरील कर, (०१) (०६) वाहन चालविण्यासाठी चाचणी घेताना गुणात्मक वाढ करण्याकरिता पायाभूत सोयीमध्ये दर्जावाढ करणे, कृत्रिम चाचणी पथ बांधणे (योजनांतर्गत) (२०४१ ०३२१) १३ कार्यालयीन खर्च" या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात उपलब्ध असणा-या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर आदेश, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३०४ सा.बां./इमा-२, दि.१०.०१.२०१८ नुसार तसेच, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, दि.१७.०४.२०१५ सुधारीत मधील भाग-पहिला,उप विभाग-५, अनुक्रमांक ३ व महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्र.१३४ अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११११७४२०५२३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df749270342 8e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.01.11 17:47:48 +05'30'

(द.ह.कदम)

अवर सचिव, गृह (परिवहन) विभाग

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव

२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरिक्षा) / (लेखा वअनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. जिल्हाधिकारी, रायगड
७. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/ लेखा),परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
९. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड
११.उप सचिव (इमा) (सार्वजनिक बांधकाम विभाग), मंत्रालय, मुबई.
१२.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग.
१३.निवड नस्ती, परि-४.